MHKO120000802019

## निशाण क्रमांक १८ खालील आदेश.

जाबदार क्र.१ ते ५ यांनी सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ व २७ अन्वये केलेला आहे.

०२. जाबदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार यांनी मुळ अर्जामध्ये जाबदार क्र.१ ते ५ यांच्या विरुध्द केलेली सर्व कथने व आरोप हे खोटे व लबाडीचे आहेत. तसेच, अर्जदार तर्फे दाखल केलेला मुळ अर्ज व अंतरिम पोटगीसाठीचा अर्जास स्थळसिमेची बाधा येता असल्यामुळे सदरचे अर्ज या न्यायालयात चालणेस पात्र नाहीत. जाबदार पुढे कथन करतात की, अर्जदार ह्या जाबदार यांच्यापासून विभक्त झाल्यापासून बोरवडे ता. कागल, जि. कोल्हापूर येथे त्यांच्या आई-वडीलांकडे वास्तव्यास आहेत. तसेच, अर्जदार ह्या त्यांच्या वडीलांच्या बोरवडे ता. कागल, जि. कोल्हापूर येथील दवाखान्याचे व्यवस्थापन व शेती सांभळत अन्य व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे अर्जदार ह्या कधीही गारगोटी येथील रहिवाशी नव्हत्या व नाहीत. असे असताना अर्जदार यांनी केवळ जाबदार यांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास देण्याच्या दुष्ट हेतूने सदरचा अर्ज या न्यायालयाच्या स्थलसिमेत येत नाही याची माहिती असतानासुध्दा जाणिवपूर्वक खोट्या आशयाचे कारण पुढे करुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी दाखल केलेला मुळ अर्ज व अंतरिम अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची जाबदार यांनी विनंती केलेली आहे.

०३. अर्जदारने सदर अर्जास निशाण क्र. १९ वर आपले म्हणणे सादर केले असुन, जाबदार यांची सर्व कथने स्पष्टपणे नाकारली आहेत व जाबदार यांचा अर्ज चुकीचा व लबाडीचा असल्याचे कथन केले आहे. अर्जदार पुढे कथन करतात की, त्या याच न्यायालयाच्या स्थळसिमेत रहाण्यास असल्याने सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. तसेच जाबदार यांनी प्रस्तुत कामी चालढकल करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. जाबदार यांनी अर्जदार यांचा त्याग केल्या नंतर अर्जदार ह्या काही काळ त्यांच्या माहेरी वडीलांकडे रहाण्यास होत्या मात्र माहेरच्या लोकांमध्ये उलटसुलट चर्चा होवू नये तसेच त्यांच्या माहेरच्या कुटूंबियांची बदनामी होवू नये या कारणास्तव अर्जदार ह्या त्यांचे पाहूणे श्री. गजानन यशवंत भाट, यांच्या गारगोटी येथील घरामध्ये फेब्रुवार २०१९ पासून तात्पुरत्या स्वरुपात रहावयास आहेत. तसेच, त्यांच्या पुढील शिक्षणासाठी त्या गारगोटी येथे रहाण्यास असुन त्या त्यांच्या वडीलांकडे देखील जावून येवून असतात. या बाबीचा विपर्यास करुन जाबदार यांनी प्रस्तुतचा खोटा व चुकीचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे जाबदार यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची अर्जदार यांनी विनंती केली आहे.

०४. प्रकरणामधील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. जाबदारतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार ही बोरवडे ता. कागल, जि. कोल्हापूर येथे त्यांच्या आई-वडीलांकडे वास्तव्यास आहेत. त्यामुळे अर्जदार ह्या कधीही गारगोटी येथील रहिवाशी नव्हत्या व नाहीत परंतु असे असताना अर्जदार यांनी केवळ जाबदार यांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास देण्याच्या दुष्ट हेतूने सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याच्या पृष्ठर्थ जाबदार यांनी निशाण क्र.२७, अ.क्र.१ वर अर्जदार व तिच्या आई-वडीलांविरुध्द मुरगुड पोलीस ठाण्यात दाखल केलेली एन.सी. प्रत दाखल केलेली आहे. त्यावर अर्जदार हिचा पत्ता बोरवडे, ता. कागल असा दिलेला आहे. तसेच, जाबदार यांनी निशाण क्र.२५, अ. क्र.२ वर दाखल केलेल्या हिंदू विवाह अर्ज क्र.२९/२००९ मधील समन्स, अ.क्र.३ वरील सदर समन्सचा अहवाल, अ.क्र.४ वरील जाबदार यांनी अर्जदार यांना ता. कागल वरील पत्त्यावर पाठविलेली नोटीस, अ.क्र.५ वरील अर्जदार यांना सदरची नोटीस प्राप्त झाल्याबाबतची उत्तरी नोटीस, तसेच अ.क्र. ६ व ७ वरील राधानगरी पोलीस ठाण्यातील एन.सी. अहवालाच्या प्रत दाखल केलेली आहेत व त्यामध्ये देखील अर्जदार हिचा पत्ता बोरवडे, ता. कागल असा असल्याचे कथन केलेले आहे. जाबदार यांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठर्थ Criminal Revision Application 146/2017 मा. उच्च न्यायालय, मुंबई - नागपूर बेंच यांच्या न्यायनिर्णयाची प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने " *Temporary residence means a residence set up or acquired in the ordinary course of human affairs and is not a residence set up with an intention to file a case and confer jurisdiction upon the magistrate* " असा निष्कर्ष काढलेला आहे.

०६. याउलट, अर्जदारने निशाण क्र.२२ वर गजानन भाट यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जदार ह्या माहेरील गांवातील लोकांमध्ये उलटसुलट चर्चा होवू नये म्हणून व माहेरच्या कुटूंबियांची बदनामी होवू नये व तसेच त्यांच्या पुढील शिक्षणाकरीता फेब्रुवारी २०१९ पासुन त्यांच्याकडे रहाण्यास असल्याचे कथन केले आहे. तसेच, संरक्षण अधिकारी यांनी त्यांच्या अहवालामध्ये देखील अर्जदार ह्या द्वारा गजानन यशवंत भाट, रा. गारगोटी येथे रहात असल्याचे कथन केलेले आहे. सकृतदर्शनी सदर कायद्याचे कलम २७ नुसार, पिडीत महिला ज्या ठिकाणी कायम किंवा तात्पुरत्या स्वरुपात रहाण्यास, नोकरीस किंवा व्यवसाय करते अशा ठिकाणी तिला अर्ज दाखल करता येतो.

०७. जाबदार यांच्या कथनानुसार, अर्जदार यांनी केवळ जाबदार यांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास देण्याच्या दुष्ट हेतूने सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. अभिलेखावरील जाबदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रानुसार अर्जदारचे माहेर बोरवडे, ता. कागल असल्याचे व ती त्या ठिकाणी वास्तव्यास असल्याचे दिसुन येते. परंतू, फेब्रुवारी २०१९

पासुन अर्जदार ही गजानन यशवंत भाट, रा. गारगोटी यांच्याकडे रहाण्यास असल्याचे संरक्षण अधिकारी यांनी त्यांच्या अहवालावरुन तसेच, स्वतः गजानन यशवंत भाट यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन दिसुन येते. यावरुन अर्जदार हिने केवळ जाबदार यांना त्रास देण्याच्या हेतूने या न्यायालयात अर्ज केल्याचे सकृतदर्शनी सिध्द होत नाही. सदर कायद्याचे कलम २७ नुसार अर्जदार हिला ती ज्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात रहाण्यास आहे अशा ठिकाणी तिला अर्ज करता येतो. त्यामुळे, सदरचा अर्ज अर्जदार हिने केवळ जाबदार यांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास देण्याच्या दुष्ट हेतूने सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे किंवा कसे ही बाब चौकशीअंती ठरवणे योग्य ठरेल. सद्यस्थितीमध्ये केवळ अर्जदार हिचे माहेर बोरवडे, ता. कागल आहे व तिला या न्यायालयात अर्ज दाखल करता येणार नाही असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे वर नमुद उपरोक्त न्यायानिर्णयाचा उचित मान राखून माझ्या मते, सदर न्यायानिर्णयातील वस्तुस्थिती व प्रस्तुत अर्जातील वस्तुस्थिती भिन्न असल्यामुळे तो या कामी लागू होणार नाही. याउलट, सकृतदर्शनी संरक्षण अधिकारी व निशाण क्र.२२ वर गजानन भाट यांचे प्रतिज्ञापत्रावरुन अर्जदार ही गारगोटी येथे रहात असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सकृतदर्शनी अर्जदार हिला सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल करण्याचा अधिकार असल्याचे दिसुन येते. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन मी खालील आदेश परीत करत आहे.

## आदेश.

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by Amit Sunil Koshti
Date: 2020.02.03 17:07:12 +0530

स्थळ. गारगोटी. **( अ. सु. कोष्टी )**
दिनांक. ०३/०२/२०२०. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, गारगोटी.